**कार्यालय पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, जालना**

**टोल फ्री क्रमांक 1064**

**कार्यालय दुरध्वनी क्र. :- 02482-220252**

**:: प्रेस नोट ::** दिनांक :- **16.03.2020.**

**कोसगाव सज्जा ता. जाफ्राबाद, जि. जालना येथील तलाठी श्री. अतुल सर्जेराव बोर्डे वय 42 वर्ष व्यवसाय नोकरी तलाठी, सजा कोसगाव ता भोकरदन रा. वरुड(बु) ता जाफ्राबाद जि जालना यांचेसह खाजगी इसमास 2,000/- रुपयांची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालनाचे पथकाने पकडले.**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | 1. श्री अतुल सर्जेराव बोर्डे वय 42 वर्ष व्यवसाय नोकरी तलाठी, सजा कोसगाव ता भोकरदन रा. वरुड(बु) ता जाफ्राबाद जि जालना<br>2. श्री. विलास सांडु आगळे वय 37 वर्ष व्यवसाय संगणक ऑपरेटर रा कोठा जहांगीर ता भोकरदन जि जालना |
| 2 | गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दि - 16.03.2020 रोजी भोकरदन - जाफ्राबाद रोडवरील तलाठी कार्यालयात माहोरा ता. जाफ्राबाद जि.जालना येथे |
| 3 | लाचेची रक्कम | :- | 2,000/- रुपये. |

याबाबत हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांनी दिनांक 16.03.2020 रोजी तक्रार दिली की, माझे सासुचे वारसा हक्क नोंद करणेसाठी व 6 क देण्यासाठी कोसगाव सजा येथील तलाठी अतुल सर्जेराव बोर्डे यांनी 3,000/- रुपयांची मागणी लाचेची मागणी केली. सदर कामासाठी तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथे संपर्क साधून तक्रार दिली. सदर तक्रारीवरुन आज दिनांक 16.03.2020 रोजी सापळा लावला असता, लोकसेवक यांनी तक्रारदार यांना 3,000/- रुपये लाचेची मागणी केली व तडजोडीअंती 2,000/- रुपये स्वीकारण्यास तयार होवुन लोकसेवक श्री अतुल सर्जेराव बोर्डे वय 42 वर्ष व्यवसाय नोकरी तलाठी, सजा कोसगाव ता भोकरदन रा. वरुड (बु) ता जाफ्राबाद जि जालना यांनी त्यांचे सोबतचे खाजगी इसम नामे श्री. विलास सांडु आगळे यांचे हस्ते पंचासमक्ष 2,000/- रुपये लाच स्वीकारली असतांना त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना पथकाने भोकरदन - जाफ्राबाद रोडवरील तलाठी कार्यालयात माहोरा ता. जाफ्राबाद येथे रंगेहाथ पकडण्यात आले.

लोकसेवक श्री अतुल सर्जेराव बोर्डे वय 42 वर्ष व्यवसाय नोकरी तलाठी, सजा कोसगाव ता भोकरदन रा. वरुड(बु) ता जाफ्राबाद जि जालना व खाजगी इसम नामे श्री. विलास सांडु आगळे वय 37 वर्ष व्यवसाय संगणक ऑपरेटर रा कोठा जहांगीर ता भोकरदन जि जालना यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत पुढील कार्यवाही चालु आहे.

***तसेच अॅन्टी करप्शन ब्युरो जालना यांचे कडुन आवाहन करण्यात येते की, कोणी लोकसेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास 02482-220252, तसेच टोल फ्री क्रमांक 1064 वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं. 8975762906, पोलीस निरीक्षक मो.नं. 8390757835, 9823216788 वर संपर्क करावा.***

( एस.एस.ताटे )

पोलीस निरीक्षक,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,जालना.